वर्ष पहिले , अंक पहिला

जानेवारी १९८१

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

BRUHAN MAHARASTRA MANDAL
C/O. SHARAD V. GODBOLE
255 MARICOPA LN.
HOFFMAN ESTATES, IL. 60194.

# बृहन्महाराष्ट्रवृत्ताविषयी थोडेसें......

बृहन्महाराष्ट्रवृत्त हे पत्रक सुरु करण्यापूर्वी आम्ही आम्हाला माहिती असलेल्या उत्तर अमेरिका व कॅनडा येथील मराठी लोकाना पत्र पाठवून त्याना आमची भूमिका कळवली होती, त्यांच्याकडूनहि सूचना मागवल्या होत्या. साधारणतः २०० पत्रांपैकी १३० पत्रे उत्तेजनार्थक आली नि तेव्हाच ठरवलं की वृत्तपत्रतरी सुरु करायला हरकत नाही. काही लोकांनी या वृत्तपत्राने कॅनडाहून निघणाऱ्या 'एकता' या एकमेव मराठी नियतकालिकास बाध येईल की काय अशी शंका व्यक्त केली. 'एकता'ला बाध का यावा! आमचाहि या नियतकालिकाला संपूर्ण पाठिंबा आहेच, एवढंच नव्हे तर त्याना सर्वतोपरी सहाय्य आजवर केलेले आहेच नि यापुढेहि करण्याची आमची तयारी आहे. आमचं केवळ बातमीपत्र आहे नि 'एकता' साहित्याने नटलेले आहे हा फरक लक्षांत घेण्याजोगा आहे. एकताच्या कार्यकर्त्यांशी अनेकदा फोनवर चर्चा झालेली आहे व त्यांनीहि फोनवरून आमच्या या कार्याला मदत करण्याचे सुचवले आहे, आम्ही केलेल्या लेखी व्यवहाराला त्यांच्याकडून जेव्हां उत्तर येईल तेव्हा त्याला अवश्य प्रसिध्दी देऊं.

या व यानंतरच्या कांही अंकांना मिळणाऱ्या प्रतिसादावरून आमची वाटचाल ठरणार असल्याने सध्यातरी सुरुवातीपासूनच आम्ही वर्गणी गोळा केलेली नाही. आर्थिक पाठबळाशिवाय अशा योजना टिकत नाहीत याची कल्पना आम्हाला आहे. परंतु तुम्हाला हा उपक्रम आवडला, टिकावा, वाढावा असे वाटले तर तुम्हीच आपणाहून हातभार लावाल अशी अपेक्षा आहे. याचे भवितव्य आपण सर्वांनी ठरवायचं आहे, सुरुवात तर उत्साहाने केलेली आहे.

तिळातिळाने वाढावा भावनांचा एक दुवा
दुरावल्या जीवनाचा बांध नव्याने जुळावा.

संपादक मंडळ

नवीन सभासदांसाठी : ज्या वाचकाना किंवा त्यांच्या मित्रमंडळींना हा अंक आपल्याकडे नियमित यावा असे वाटत असेल त्यांनी खालील माहितीपत्रक पूर्ण करून कृपया आमच्याकडे शक्य तितक्या लवकर पाठवावे ही विनन्ति आहे. आपण हे माहितीपत्रक पाठवल्याशिवाय आपल्याला अंक पाठवणे आम्हांला शक्य नाही याची कृपया नोंद घ्यावी.

| |
|---|
| Name: |
| ADDRESS: |
| PHONE: |

पाठविण्याचा पत्ता :

# ठळक बातम्या

## शेतकरी आंदोलन

आठ- नऊ महिनापूर्वी चाकणला श्री. शरद जोशी यांनी कांदा उत्पादकांचे आंदोलन सुरू केले. सत्तारूढ पक्षाला अडचणीत टाकणारे हे आंदोलन कुठल्याहि पक्षाशी संबंध नसलेल्या शरद जोशींच्या नेतृत्वाखाली सर्वव्यापी झाले. शेतमालाला आधारभूत किंमत मिळावी हे एकच सूत्र यामागे आहे. ७ डिसेंबरला जळगांव ते नागपूर (४६५ कि.मी.) या दरम्यान शेतकऱ्यांची दिंडी मार्गस्थ झाली, या दिंडीत विविधपक्षीय मंडळी सामील होती. मध्यंतरीच्या काळात शेतकऱ्यांच्या मोर्च्यावर गोळीबार होण्याच्या दुर्घटनाहि घडल्या. हजारो शेतकऱ्यांना पकडण्यात आले. सरकारला विचार करायला सवड मिळावी यासाठी श्री. शरद जोशींनी आंदोलन काही काळ स्थगित करायचे ठरविले, त्यावर सर्व विरुद्ध पक्षनेत्यांनी टीकेची झोड उठवली. माजी मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी श्री. शरद जोशी हे वसंतदादांच्या हातचे बाहुले असून इंदिरा पक्षांतर्गत राजकारणातील एका गटाचे प्रतिनिधी असल्याचे विधान करून आंदोलनाचे नेतृत्व स्वतःकडे घेतले.

केन्द्रीय नेत्यांशी होणारी चर्चा लक्षात घेऊन १ जानेवारीपासून आंदोलन पुन्हा सुरू करू नये. शेतकऱ्यांच्या मागण्या केन्द्र सरकारकडून मान्य करून घेण्यात राज्यसरकार सहकार्य करेल असे आश्वासन मिळाल्याचे संघटना-नेते म्हणतात. दिल्लीत केंद्रीय कृषीमंत्री राव वीरेंद्रसिंग यांच्याशी शेतमालाच्या भावासंबंधी चर्चा करून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री प्रयत्नातीत रहाणार आहेत. त्याचप्रमाणे संघटना- नेते श्री. शरद जोशी हेदेखील एका शिष्टमंडळासमवेत केंद्रीय कृषीमंत्र्यांशी चर्चा करणार असल्याचे कळते.

---

**कोल्हापूर बंद**: रस्तेप्रकरणी रिक्षावाल्यांनी महापालिकेला करावयाच्या घेरावप्रकरणी झालेल्या निषेधार्थ ३ जानेवारीला सर्व दिवस कोल्हापूर बंदचा कार्यक्रम हाती घेण्यात आला.

'National society of equal opportunities for handicapped' व महाराष्ट्र शासनाचे समाज कल्याण संचालनीय यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक अपंग वर्ष प्रारंभानिमित्त एक अपंग मेळावा १ जानेवारीला मुंबईत शिवाजीपार्कवर भरण्यात आला. त्या प्रसंगी अपंगासाठी सर्व नोकऱ्यांत ३ टक्के जागा राखीव ठेवण्याबद्दल सुचवण्यात आले.

---

महाराष्ट्र जनता पक्षाचे नवे अध्यक्ष म्हणून श्री. राजारामबापू पाटील यांची एकमताने निवड झाली. पक्षाचे पहिलेच अधिवेशन शहाद्याला येथील सानेगुरुजी विद्यालयाच्या आवारात भरविण्यात आले. या अधिवेशनाला जमलेली प्रचंड गर्दी हीच महत्वाची बातमी होईल. मुंबईत विधानसभेवर २ मार्च रोजी शेतकऱ्यांचा दिंडी मोर्चा नेणे आणि तोपर्यंत सारा ग्रामीण भाग दिंडीमय करून टाकणे असा निर्णय या अधिवेशनांत घेण्यात आला.

---

महाराष्ट्रात 'केसरी' वर्तमानपत्र सुरू होऊन ४ जानेवारीला १०० वर्षे पूर्ण झाली. लोकमान्य टिळकांच्या मृत्यूपर्यंत व त्यानंतरहि काही काळ महाराष्ट्रीयांच्या जीवनात 'केसरी'चे महत्त्व निर्विवाद होते. केसरीने वृत्तपत्रांच्या क्षेत्रात नवा कालखंड निर्माण केला, एकूण मराठी जीवनाला नवीन वळण लागले. म्हणूनच शताब्दी सोहळ्याबद्दल सर्व महाराष्ट्रभर एकप्रकारची आस्था आहे. भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी प्रमुख पाहुण्या म्हणून या समारंभाला हजर होत्या.

---

चेतना महाविद्यालयाच्या बेमुदत संपाला पाठिंबा देण्यासाठी दि. १५ जानेवारीला सर्व

महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्यांनी लाक्षणिक संप करण्याचा निर्णय घेतला आहे.

---

संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्यात शेतकऱ्यांना जमिनी देण्याच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात जंगलतोड चालू आहे. लाकूड ठेकेदाराशी संगनमत करून चालू केलेली ही जंगलतोड थांबवण्याच्या दृष्टीने अधिकाऱ्याची चौकशी करण्याची मागणी श्री. एम्. रहमतुल्ला यांनी केली आहे.

---

सांगली, सातारा व कोल्हापूर या तिन्ही जिल्ह्यातील ४४ ग्रामीण व प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना येत्या दीड-दोन महिन्यात सुरू होतील. योजनांचा एकूण खर्च ३ कोटी ५० लाख रुपये असून १ लाख ४४ हजार लोकवस्तीला पाणी उपलब्ध होईल.

---

पाळणेकोंट धरणयोजनेने सावंतवाडी या शहरातील पाण्याची वाढती मागणी पुरी झाली. पाणी शुध्दीकरणास जरूरीच्या प्लॅन्टसाठी लागणाऱ्या खर्चाची तरतूद शासनातर्फे झाली आहे.

---

मुंबईकरांना मिळणाऱ्या सरकारी दुधाचे दर वाढण्याची शक्यता आहे. दर लिटरमागे ६० पैशांनी वाढवण्याची सूचना सरकार विचार करीत आहे. सध्या लिटरला ३ रु. ४० पैसे पडतात. दर न वाढवल्यास आंदोलन करण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

---

नव्या वर्षाच्या सुरुवातीसच सहार विमानतळावर कस्टम अधिकाऱ्यांनी १२ लाख रु. किमतीचे परकीय चलन हस्तगत केले. ते एअर-इंडियाच्या हाँगकाँगला जाणाऱ्या विमानांत दडवलेले होते. त्यासबबीखाली अनेक कर्मचाऱ्यांना अटक केली असून दडवण्याचे काम सुसंघटित असल्याचा पुरावा कर्मचाऱ्यांच्या घरांत मिळाला.

भाजी व्यापाराच्या आठ दिवसांच्या संपानंतर सध्या मुंबईत ताज्या भाज्या मुबलकपणे मिळत आहेत. मटार अडीच रु. किलोने तर फ्लॉवर दोन ते तीन रुपयांनी विकले जात आहेत. संपापूर्वी याच भाज्यांचे दर किमान १ रु. व कमाल ७ रुपयांनी जास्त होते.

---

महाराष्ट्रातील स्त्रीशिक्षण चळवळीच्या आद्य प्रवर्तक सावित्रीबाई फुले यांच्या १५०व्या जयंतीदिनी चर्नीरोडच्या शासकीय महिला वसतीगृहाला मुख्यमंत्री अंतुले यांच्या हस्ते 'श्रीमती सावित्रीबाई फुले छात्रालय' असे नाव देण्यात आले.

---

मुंबई शहराला विद्युत् पुरवठा करणाऱ्या 'बेस्ट' या पालिकेच्या उपक्रमास ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त खास समारंभ आयोजित केले आहेत.

---

पणजीनजीक बांबोळी इस्पितळाचे काम ठरल्याप्रमाणे यावर्षी पूर्ण होईल असे गोव्याचे आरोग्यमंत्री श्री. हसन यांनी कळवले.

---

फलटणच्या जनतेच्या मागणीनुसार फलटण-चिपळूण बसमार्ग सुरु झाला. या नव्या बसमुळे सातारा, लोणंद, उंब्रज भागातील कर्मचाऱ्यांची सोय झाली.

---

## असुरक्षित मुंबई:

रविवारी ४ जानेवारीला सकाळी १०-११ च्या दरम्यान पश्चिम रेल्वेच्या पहिल्या वर्गातील डब्यात अंधेरी येथील महाविद्यालयाच्या इंग्रजी विषयाच्या प्राध्यापिकेचा खून करण्यात आला. सोन्याच्या बांगड्या व मंगळसूत्रापायी जीव गमवावा लागला.

गुरुवारी १ जानेवारीला बॉम्बे सेंट्रल ते

महालक्ष्मी स्टेशनाच्या दरम्यान चालत्या गाडीत सुरा दाखवून घड्याळे व साखळ्या असा एकूण ३०५५ रुपयांच्या वस्तू पळवल्याची घटना घडली.

त्याच दिवशी कल्याण-शहाड रेल्वेस्टेशन दरम्यान टिटवाळा लोकलमधे रात्री साडेआठला एका प्रवाशावर चाकूहल्ला होऊन तो जागच्याजागी ठार झाला. या हल्लेखोराला अटक करण्यात आली.

महालक्ष्मी स्टेशन व रेसकोर्समधील भाग व वरळी रस्त्यावर भर दिवसा महिलांवर हल्ले केल्याचे बरेच प्रसंग घडले आहेत. तसेच विरार सफाळा या दोन्ही ठिकाणी गुंडांच्या टोळ्या आहेत. निवडणुकीच्या वेळी गुंडांचा पुढारी उपयोग करून घेत असल्याने त्यांनी काही केले तरी त्यांना संरक्षण मिळते सामान्य जनता मात्र जीव मुठीत धरून जीवन जगते आहे. या गुंडांना आवरणार कोण?

मुंबईचे हे नवे स्वरूप हादरा देण्याजोगे आहे. पूर्वी शाळाकॉलेजात जातांना दिवसा रात्री बेधडक प्रवास करणाऱ्या मुंबईकरांच्या या नव्या भीतीने थरकापच उडवला असेल. अमेरिकेतील मोठ्या शहरातून गुन्हेगारी वृत्ते वरचेवर वाचावयास मिळतात. मुंबईत अतां याबाबतीततरी त्या शहरांशी साम्य आढळते. वाढत्या समृद्धीला हा शाप तर नव्हे?

मुंबईतच नाही तर पुण्यातदेखील अशा गुन्हेगारीचे प्रमाण वाढत असून महाराष्ट्रात महिलांवर होणाऱ्या अत्याचारांना आजकाल उधाण आल्यासारखे वाटते. बलात्कारविरोधी महिला परिषदेने पुण्यातील अधिवेशनात बलात्कारासंबंधीचा सध्याचा कायदा अधिक कडक करावा असा ठराव संमत करण्यात आला. महाराष्ट्र जनता पक्षातर्फे भरविण्यात आलेल्या महिला मेळाव्याबद्दल बोलताना, हा मेळावा म्हणजे महिलांवरील अत्याचाराविरोधी आंदोलनाचा प्रारंभच होय असे उद्‌गार खासदार प्रमिला दंडवते यांनी काढले.

## आर्थिक हातभाराविषयी:

या मासिक वृत्तपत्राला वर्गणी अजून ठरवलेली नाही. तुमच्या प्रतिसादावर ते अवलंबून आहे. तुम्ही केलेल्या मदतीमुळे तुम्हाला Tax deduction मिळवण्याबद्दल जरूर ती तयारी आम्ही केलेली आहे.

अधिक माहितीसाठी:

BRUHAN MAHARASTRA MANDAL
C/O SHARAD V. GODBOLE
255 MARICOPA LN.
HOFFMAN ESTATES, IL.
60194.

## जाहिरातदारांसाठी:

बृहन्महाराष्ट्र वृत्तपत्रासाठी व्यापारी व व्यक्तिगत जाहिराती स्वीकारल्या जातील.

जाहिरातींचे दर:

| | |
|---|---|
| संपूर्ण पृष्ठ | ५० डॉलर्स |
| १/२ पृष्ठ | ३० डॉलर्स |
| १/४ पृष्ठ | २० डॉलर्स |
| १/८ पृष्ठ | १२ डॉलर्स |

व्यक्तिगत जाहिरातीस ५ डॉलर्स

पत्रव्यवहाराचा पत्ता:

MR. VISHNU VAIDYA.
5505 W. WINDSOR AVE.
CHICAGO, ILL 60630
PHONE: (312)-281-5335 DAYS
(312)-283-6341
EVENINGS & WEEKENDS.

# औद्योगिक

महाराष्ट्राची घसरण : मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या चौथ्या अधिवेशनाचे अध्यक्ष वि. वि. बोरकर यानी महाराष्ट्र राज्य पूर्वी आर्थिकविकासांत पुढे होते ते दिवसेदिवस मागे पडत आहे आणि अविकसित भाग व विकसित भाग यांच्यातील विषमता वाढत असल्याचे निदर्शनास आणले.

---

महाराष्ट्रातील बाजारपेठात पंजाबी शेतकऱ्याचे अतिक्रमण झाल्याने पुण्यातील धाऊक व्यापार हल्ली घसरत आहे.

---

महाराष्ट्रात बेडूक निर्यातीच्या व्यापारात सुमारे २०-२५ कंपन्या गुंतलेल्या असून एका वर्षात या व्यवसायाने भारताला ७ कोटी ३० लाख रु.चे परकीय चलन मिळवून दिले. बेडूक जंतू खाऊन पिकांचे नैसर्गिक रक्षण करीत असल्याने या नव्या व्यवसायाने पिकांना नुकसान पोचेल की काय हा प्रश्न उद्भवला आहे.

---

मुंबईच्या उपसागरात उपलब्ध असलेल्या सागरी वायुवर आधारित थळ खत प्रकल्पाच्या अमोनिया कारखान्यासंबंधी करार झाला असून हा भारतातील सर्वात मोठा खत कारखाना व युरिया बनविणारा जगातील सर्वात मोठा कारखाना ठरेल. याला जोडूनच जडपाणी प्रकल्पहि उभारणार आहे.

---

मास्कोत गंगा डिपार्टमेंट स्टोअरने एका वर्षात सुमारे २४ कोटी रुपयाचा माल विकला असून रोजची १० लाखाची विक्री आहे.

---

मतदानपत्रिकेचा व्याप संपवणारे electronic मतदान यंत्र भारतीय electronic महामंडळाने निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनाखाली तयार केले असून त्याचा वापर केल्याने मानवी श्रमाची व साधनसामग्रीची बचत होईल व प्रत्येक मतदारसंघातील निवडणुकीमागे २ लाख ७० हजार रुपये वाचतील असा अंदाज आहे.

पूर्वी मुंबईत कोंबडी १८ रु. किलोने मिळत असे, गेले तीन महिने १२ रु. किलोने मिळते. भाव कमी होण्याचे कारण कदाचित् शीतगृहात साठलेल्या १५ हजार कोंबड्या खपवण्याचे असावे.

---

भाववाढ रोखल्याचा सरकारी दावा असला तरी कामगार ग्राहक मूल्य निर्देशांकानुसार सर्व उद्योग केंद्रात निर्देशांक वाढला असून एका मुंबईचा निर्देशांक ११ अंशानी वाढला आहे.

---

महाराष्ट्र लघुउद्योग महामंडळाने या आर्थिक वर्षात ४६ कोटी ४३ लक्ष रुपयांचा व्यवहार करून ८२ लक्ष रुपयांचा नफा मिळवला. सामान्यतः ४१ टक्के वार्षिक वाढ झाल्याचे दिसून येते.

---

Builders assoc. of India तर्फे देशभरच्या बांधकाम कंत्राटदारांचे एक अधिवेशन ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारीपर्यंत मुंबईत बांधकाम उद्योगापुढील विविध समस्यांवर चर्चा करण्यासाठी भरविण्यात येणार आहे.

---

मासळी विक्रेत्यासमाजासाठी शहरातील मोईवाडा (कल्याण) भागात स्वतंत्र मार्केट असावे या मागणीसाठी सुमारे दीड हजार कोळी लोकांचा मोर्चा कल्याण नगरपालिकेवर नेऊन नगराध्यक्ष व मुख्याधिकारी याना घेराव घालण्यात आला.

---

सोलापूर जिल्ह्यातील स्टेट बँकेच्या ग्रामीण विभागातील शाखातर्फे आर्थिकदृष्ट्या दुर्बल व छोट्या शेतकऱ्याना शेतीविषयक सुधारणा करण्यासाठी १० कोटींचे कर्ज अल्पदराने देण्यात आले.

औरंगाबाद येथील औद्योगिक परिसरांतील तीस एकर जागेत लवकरच दुग्ध व्यवसायासाठी लागणाऱ्या यंत्रनिर्मितीचा ५०० कोटींचा प्रकल्प एच. एम. टी. उभारणार आहे.

# साहित्य-संगीत-कला

अखिल भारतीय नवीन साहित्य महामंडळाचा पहिला मेळावा सोलापूर येथे भरला होता. वैयक्तिक हेवेदावे दूर सारून नवोदितांच्या समस्या सोडवण्याचे काम हे महामंडळ करणार आहे. श्री. म. जा. अदवंत हे अध्यक्षस्थानी होते.

राज्य मराठी वाङ्मय पुरस्कार:

काव्य: श्री. केशव मेश्राम (उत्खनन) १५०० रु.

श्री. पाडगांवकर (काव्य सलाम), श्री बापट (काव्यमानसी) १००० रु.

नाटक: श्री. दिलीप गुलाबसिंह परदेशी (एक स्वप्न वाल्याचे)

श्री. मधुसूदन कालेलकर (सागरा प्राण तळमळला)

कथा: श्री. बा. वि. प्रभुदेसाई (जहाज) १५०० रु.

श्री. आ. जा. पेडणेकर (रेडग्रिन) १५०० रु.

श्री. रत्नाकर मतकरी (रंगांधळा) १०००

श्री. बाबा पाटील (हीवाट चालावी) १००० रु.

चरित्र व आत्मचरित्र: श्री. य. दि. फडके १५०० रु. (शोध बाळ गोपाळाचा)

---

## नवोदित कलाकारांचे आश्रयस्थान:

नवोदित कलाकारामधूनच भविष्यातील समर्थ कलाकार निर्माण होऊ शकतात या कल्पनेने प्रेरित होऊन श्री. कृ. गो. धर्माधिकारी यानी 'गानवर्धन' ही संस्था सुरु केली आहे. नवोदित कलाकारांच्या २४ सभा सादर करण्याची योजना आहे. एकहि कलाकार दोनदां सादर केला जाणार नाही.

---

भारतीय संगीत, नृत्य, नाट्य आदिंचा मनसोक्त निर्भेळ व पुरेपूर आनंद लुटू देणारे सर्वांगसुंदर नाट्यगृह म्हणून मुंबईतील टाटा रंगमंदिर या नव्या गृहाचा उल्लेख करावा लागेल.

---

श्री. अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या संगीत शाकुंतलाचा पहिला प्रयोग ४.१.१८७५ रोजी बेळगांव येथें झाला, असे जळगांवचे संशोधक, समीक्षक श्री. कृ. वा. मराठे यांचे मत आहे.

**शताब्दी वर्ष:** श्री. अण्णासाहेब किर्लोस्कर यानी सुरु केलेल्या मराठी संगीत रंगभूमीला ३१ आक्टोबरला शंभर वर्षे पूर्ण झाली त्यानिमित्त हे वर्ष शताब्दी वर्ष म्हणून साजरे करण्याची योजना अ. भा. मराठी नाट्यपरिषदेने जाहिर केली. सध्याचे नाट्यपरिषदेचे अध्यक्ष स्वरराज छोटा गंधर्व हे असून मुख्यमंत्री श्री. अंतुले यांच्या नेतृत्वाखाली दोन संगीत नाट्यमहोत्सव साजरे केले जातील. शतरंग हा शंभर वर्षांच्या वाटचालीचे धावते दर्शन देणारा व अनेक नामवंत कलाकारांचे सहकार्य असलेला कार्यक्रम प्रमुख आकर्षण आहे. महोत्सवांत पांच लाख रुपयाचा कलावन्त सहाय्यक निधि जमा करण्यात आला.

---

आय. एन. टी. ने दोन वर्षांचा डिप्लोमा कोर्स सुरु केला असून त्याच्या पहिल्या पदवीदान समारंभात भाषण करताना नरवर्य मामा पेंडसे यानी उपक्रमाची स्तुती केली व संस्कृतीला विघातक अशी दृश्ये नाटकात दाखवू नका असा आदेश दिला.

## 'घाशीराम' चा परदेश-दौरा:

जागतिक रंगभूमी-दिनाच्या दिवशी स्थापन झालेल्या थिएटर ॲकॅडमी या संस्थेतर्फे वादग्रस्त नाटक 'घाशीराम कोतवाल' हे प. जर्मनीतील नाट्यमहोत्सवात सादर केले गेले. मराठी नाटकाला हा मान प्रथमच मिळत आहे. परदेशदौऱ्यात जर्मनी, इंग्लंड, हॉलंड, इटली आदि देशांत २४ प्रयोग झाले. या नाटकाच्या उभारणीचे प्रमुख शिल्पकार म्हणून लेखक: विजय तेंडूलकर, दिग्दर्शक: जब्बार पटेल, प्रमुख भूमिकेत डॉ. मोहन आगाशे निर्मिति प्रमुख श्रीधर राजगुरु, संगीतकार भास्कर चंदावरकर, नृत्यशिक्षक कृष्णदेव मुळगुंद यांचा उल्लेख करावा लागेल याशिवाय ३७ कलाकारांचाहि या यशात वाटा आहे. 'घाशीराम' हे ऐतिहासिकदृष्ट्या बिनचूक आणि कलेचा उत्कृष्ट नमुना आहे व

परदेशदौऱ्याने भारतीय प्रतिष्ठेत भर पडली आहे असे उद्‌गार सुप्रसिध्द सिनेदिग्दर्शक सत्यजित रे यांनी काढले.

---

मुंबई मराठी साहित्य संघाचे बृहन्मुंबई उपनगर साहित्यसंमेलन, मालाडमधे 'पंचशील ज्ञानपीठ' या संस्थेतर्फे भरणार आहे. पूर्वतयारीसाठी नवोदित लेखक लेखिकांचा मेळावा भरणार आहे.

---

महाराष्ट्र शासनातर्फे राज्य संगीत, नृत्य महोत्सव गडकरी रंगायतन, ठाणे येथे ७ ते ११ जानेवारीला झाला.

---

अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाने ध्वनिमुद्रिका व ध्वनिफितींचा अद्यावत् संग्रह करण्याचे काम हाती घेतले असून, या कामासाठी महाराष्ट्र शासनाने बारा हजार रुपये अनुदान दिले आहे.

---

मराठवाड्यातील सांस्कृतिक व वाङ्‌मयीन हालचालींना नवा बहर आल्यासारखा दिसतो. 'दलित थिएटर्स' तर्फे 'आठवणींचे पक्षी' हे नवे नाटक सादर केले. 'यंग डिबेटर्स' रस्त्यावरील नाटकें करतात तर काही कॉलेज युवकांनी 'संघर्ष' नावाचे नियतकालिक सुरू केले आहे. 'वऱ्हाड चाललय् लंडनला' या प्रा. लक्ष्मण देशपांडे यांच्या एकपात्रीचे १५०च्यावर प्रयोग झाले. मराठवाड्यातील लेखकमंडळी राज्यपुरस्कार मिळवून त्यांची 'हॅट्ट्रीक' करतात.

---

## दुःखद निधन :

अनेक मराठी नाटकातून भूमिका केलेल्या पुष्पा भोसले या अभिनेत्रीचा कोल्हापूर येथील 'त्रिशूळ' लॉजमधे ५ जानेवारी रोजी खून करण्यात आला.

## मानसन्मान :

- संगीत, अभिनय व रंगभूमीची गेली तेवीस वर्षे सेवा करीत असलेल्या सुप्रसिध्द सौ. ज्योत्स्ना भोळे या यंदाच्या विष्णुदास भावे पारितोषिकाच्या मानकरी आहेत.
- किराना घराण्याच्या ख्यातनाम गायिका माणिक वर्मा याना संगीत नाटक अकादमीची दोन वर्षांची फेलोशिप मिळाली आहे.
- सदानंद जोशीकथित 'मी नथुराम बोलतोय'ची वाटचाल दोन हजारांवर झाली आहे.
- सुप्रसिध्द संगीतकार सी. रामचंद्र यांच्या संगीत नियोजक निवडक गीतांचा 'भुलाये न बने' चा १०१ वा प्रयोग सादर करण्यात आला.
- **फिल्मफेअर अवॉर्ड** वितरण समारंभ मुंबईत सादर करण्यात आला. प्रमुख कलाकार न आल्याने त्या पांच तासाच्या कार्यक्रमाला प्रेक्षक वैतागून गेले.

यंदाचा सर्वोत्कृष्ट चित्रपट : गोधुली
सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक : सत्यजित रे (गोधुली)
सर्वोत्कृष्ट अभिनेता : अमिताभ बच्चन
सर्वोत्कृष्ट अभिनेत्री : दीप्ती नवल (एक बार फिर)
सर्वोत्कृष्ट गीतकार : सुदर्शन फकीर (दूरियाँ) व माया गोविंद (सावन को आने दो)
स. पार्श्वगायक : महंमद रफी (सरगम)
पार्श्वगायिका : अनुराधा पौडवाल (एक बार फिर)
संगीतकार : लक्ष्मीकांत-प्यारेलाल (सरगम)
यांची निवड करण्यात आली.

---

## दुःखद निधन

मराठी चित्रसृष्टीतील व नाट्यसृष्टीतील अभिनेत्री श्रीमती माई भिडे यांचे दीर्घ आजारानंतर २ जानेवारी रोजी मुंबईत देहावसान झाले. त्यांचे वय ६१ वर्षांचे होते. कै. राजा परांजपे यांच्यासमवेत त्यांनी चित्रपटातून कामे केली होती.